# शकील बदायुनी - भाग ५



आणि त्यांच्या कव्वालीबद्दल काय सांगायचे ! 'शर्माके यूँ क्यू सब परदानशीन' (आशा, शमशाद, कोरस/'चौदहवी का चाँद') आणि 'तेरी महफिल मे किस्मत आजमाकर हम भी देखेंगे' [मोहब्बत हमने माना जिंदगी बरबाद करती है, ये क्या कम है की मर जाने पर दुनिया याद करती है? (लता, शमशाद, कोरस/'मुघल-ए-आजम')]

कथेतील वातावरणाशी ते समरसून जात आणि त्यामुळे त्यांच्या गाण्यांतून ते वातावरण रसिकांच्या नजरेसमोर दृश्य स्वरूपात येई आणि त्यामुळेच त्यांची गीते खूप दर्जेदार होत असत. कथेतील प्रसंग ते पूर्णपणे समजावून घेत आणि नंतरच गाण्यांतील शब्दांची ते यथोचित रचना करीत. हे करताना बरेच वेळा मनाला क्लेशही होत असणार पण गाणे चांगलेच होई. आपल्याला ते गाणे अचूकपणे लिहिता यावे म्हणून केव्हा केव्हा डझनावारी पेपर्स फाडूनही टाकले जात. 'कोहिनूर'चेच उदाहरण घ्या ना ! ह्या चित्रपटात, प्रेमभंग झालेल्या मीनाकुमारीला, खलनायक असलेल्या जीवनच्या घरी, बळजबरीने 'पाहुणी' म्हणून यावे लागते आणि त्याच वेळी एका जोग्याच्या वेषात तिचा प्रियकर असलेल्या दिलीपकुमारचा घरात प्रवेश होतो. अशा वेळी मठ्ठ खलनायकाच्या क्रूर डोळ्यांसमोर 'जरा मन की किवाडियाँ खोल, सैया तोरे द्वारे खडे (रफी आणि कोरस) हे सूचक गाणे दिलीपकुमार नायिकेला उद्देशून म्हणतो व घाबरू नको असाच इशारा देतो.

चित्रपटांच्या सर्वांगीण पूर्णत्वावर भर देणाऱ्या एम्. सादिक आणि गुरू दत्त या दिग्दर्शक द्वयीला 'चौदहवी का चाँद' बनवताना अगदी सुरुवातीलाच अवध शहराचे दर्शन आणि भावविश्व यांचा

रसिकांना अनुभव द्यायचा होता. म्हणून शीर्षकगीतामध्ये शकील यांनी ‘ये लखनौकी सरजमीन’ या शब्दांचा वापर करून अप्रतिम वेगवान गाणे लिहिले. गीतकार शकील, संगीतकार रवि आणि गायक रफी या त्रयीने या गाण्याचे सोने केले.

केवळ ‘चौदहवी का चाँद’ नाही तर या त्रिदेवांनी आणखीही बऱ्याच चित्रपटांतून आपले असामान्यत्व दाखवून दिले आहे. या तिघांनी मिळून आजवर चित्रपटांतून कधीही न ऐकलेल्या गझलांचा ‘दो बदन’ या चित्रपटातून अविस्मरणीय असा आविष्कार घडविला आहे. ‘भरी दुनिया मे आखिर दिल को समझाने कहा जाये ? मुहोब्बत हो गयी जिनको वो दिवाने कहा जाये?’ ही त्या चित्रपटातील एक सुंदर गझल ! आणि तुम्ही पुढच्या ओळी विसरला असाल तर -

लगे हैं शम्मा पर पहरे ज़माने की निगाहों के,
जिन्हें जलने की हसरत है वो परवाने कहा जाये ?

नज़र में उलझने, दिल में है आलम बेक़रारी का,
समझ में कुछ नहीं आता, सुकून पाने कहा जाये ?

सुनाना भी जिन्हें मुश्किल, छुपाना भी जिन्हें मुश्किल,
ज़रा तू ही बता ऐ दिल वो अफ़साने कहा जाये ?

खरोखरच शकील बदायुनी अतुलनीय आहेत असेच म्हणावे लागेल.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”,

which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com